| MHRG040006862024 | विशेष दिवाणी दावा क्र. ९६/२०२४<br>श्री. विवेक बालाळी बिराजदार<br>वि<br>श्री. रोशन अनंत पाटील |
|---|---|

## निशाणी १५ वरील आदेश

प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांचे विरूध्द झालेला 'विना कैफियत' सुनावणीचा झालेला आदेश रद्द करून मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

०२. प्रतिवादी यांचे विद्यमान अभियोक्ता यांनी प्रतिपादन केले की, प्रतिवादी यांना मे. कोर्टामार्फत समन्स व नोटीस काढण्यात आलेली होती. सदर समन्स व नोटीस दि. २०/०४/२०२४ रोजी प्रतिवादी यांना प्राप्त झालेली आहे. त्यानंतर प्रतिवादी हे त्यांचे वकीलांमार्फत दि. २२/०४/२०२४ रोजी हजर झालेले आहेत. प्रतिवादी यांना म्हणणे व कैफियत दाखल करणेकामी सुमारे २५५ दिवसांचा विलंब झालेला आहे. प्रतिवादी यांच्या विरोधात दि. ०८/११/२०२४ रोजी विना कैफियत दावा सुनावणीचे आदेश पारीत करण्यात आलेले आहेत. प्रतिवादी यांना दाव्यास कैफियत व निशाणी क्र. ५ वर म्हणणे देणेकरीता आवश्यक असलेले कागदपत्र हे सिडको कार्यालयातील आहेत. वादीने सदर दावा दाखल केल्यानंतर प्रतिवादी यांनी सदर दावा मिळकतीसंबंधीत सिडको कार्यालयात असलेले कागदपत्र मिळणेस उशीर झाल्याने मुदतीत सदरचे कागदपत्र प्रतिवादीस वकीलांकडे देणे शक्य झाले नाही. तसेच प्रतिवादी यांचे इतर काम ही वादींचे वडीलांकडे असल्याने दावा भुखंडाबाबत करण्यात आलेला करार हा प्रतिवादी यांनी केलेला नव्हता. परंतु, वादींचे वडीलांनी प्रतिवादी यांचे इतर कोर्ट कामाकरीता काही कागदपत्रांवर सहया घेतल्या होत्या त्या संबंधीत माहीती घेण्यास वादीस उशीर झालेला असल्यामुळे मुदतीत प्रतिवादी यांना म्हणणे व कैफियत दाखल करता आले नाही. त्यामुळे प्रतिवादी यांचे विरूध्द झालेला विनाकैफियत हा आदेश रद्द करून त्यांना कागदपत्र दाखल करण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

०३. वादीचे विद्यमान अभियोक्ता यांनी प्रतिपादन केले की, प्रतिवादी यांना

दि. २२/०४/२०२४ रोजी समन्सची बजावणी झाली असून कायदयाप्रमाणे प्रतिवादीने मुदतीत त्यांचे म्हणणे/कैफियत दाखल करणे गरजेचे होते. असे असतानाही प्रतिवादीने मुदतीत त्यांचे म्हणणे/कैफियत दाखल करण्याकरीता मा. न्यायालयाकडून मुदत वाढ घेतली नाही. सबब प्रतिवादी यांना ब-याच संधी देवून त्यांनी कैफियत दाखल केलेली नाही. प्रतिवादीने विलंबास नमूद कारण हे चुकीचे दिले असून ते संयुक्तीक नाही. त्यामुळे अर्ज खर्चासहीत नामंजुर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

०४. अर्ज, त्यावरील म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहीली. दोन्ही बाजूंचे वकीलांचा युक्तिवाद ऐकला.

०५. अभिलेखाचे अवलोकन करता तसेच वादी व प्रतिवादी यांचे प्रतिपादन विचारात घेता असे दिसुन येते की, प्रतिवादी यांच्या विरूध्द 'विना कैफियत आणि विनाम्हणणे' चा आदेश दि. ०८/११/२०२४ रोजी झाल्याचे दिसून येते. प्रस्तुत अर्ज प्रतिवादी यांनी त्यांच्याविरूध्द 'विनाकैफियत' असा झालेला आदेश रद्द करून मिळणेकरीता दाखल केलेला आहे. प्रतिवादी यांना त्यांचे म्हणणे देण्याची संधी मिळावी व प्रकरण गुणवत्तेवर निकाली करण्यासाठी व न्यायाच्या हिताच्या दृष्टीने सदरहू अर्ज खर्चासह मंजूर करणे न्यायोचीत होईल. म्हणून मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**: आदेश :**

१. अर्ज (निशाणी क्र. १५) मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांचे म्हणणे अभिलेखावर घेण्यात येते व त्यांचेविरूध्द झालेला ‘विनाकैफियत’ आदेश रद्द करण्यात येतो. परंतु, त्याआधी प्रतिवादी यांनी वादी यांना रक्कम रू. १५००/- खर्च दयावा.

UMA YASH BORADE KAPOOR
Digitally signed by UMA YASH BORADE KAPOOR
Date: 2026.03.10 12:09:25 +0530

पनवेल
दिनांक ०९/०३/२०२६.

(यु. वाय बोराडे - कपूर)
चौथे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर
पनवेल.